उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तालुका एकमेव योजनेतंर्गत धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्येशीय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक संवर्गातील पदभरतीबाबत ...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक:-HTED-३००१०(१०)/८८/२०२३-MHT-(HE-५)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- १३ मार्च, २०२४

वाचा:-

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. अनुदा-२०११/(२००/११)पुर्नबांधणी-६/मशि-४, दिनांक २६ मे, २०२२.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. पुरक-२०२२/प्र.क्र.५९/मशि-३, दिनांक ०२ जून, २०२३.
३) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे पत्र क्रमांक उशिसं/२०२३/पदभ/मवि-१/८०६५ दिनांक १३ जुलै, २०२३.
४) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती याचे पत्र क्रमाक ससं/उशि/अमती/पदभरती/ना-हरकतपत्र/२०२४, दिनांक २६.०२.२०२४.
५) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रम.ससं/उशि/अनु/बुलढाणा/२०२४/८६६, दिनांक ११.३.२०२४

**प्रस्तावना:-**

राज्यातील सर्व विभागांमध्ये समतोल शैक्षणिक विकास व्हावा असे शासनाचे सर्वसाधारण धोरण आहे. ज्या तालुक्यामध्ये एकही अनुदानित महाविद्यालय नाही अशा १० तालुक्यातील महाविद्यलयांना दिनांक १७. जून, १९९५ च्या शासन निर्णयान्वये अनुदान तत्वावर आणण्यास शासनाने मान्यता दिली. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २००१-२००२ पासून राज्यात कायम विना अनुदानाचे धोरण स्विकारले गेले आहे. राज्यात नवीन तालुक्यांच्या संख्येत वाढ झाली असल्यामुळे ज्या तालुक्यात एकही अनुदानित महाविद्यालय अथवा विद्याशाखा नाही, अशा तालुक्यांमध्ये अनुदानित तत्वावर मंजुरी देण्याची मागणी पुढे आली होती. या मागणीच्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात एक महाविद्यायास/विद्याशाखेस १००% अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचा दिनांक ०४ फेब्रुवारी २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता घेण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाने दिनांक २८.४.२०२२ रोजीच्या इतिवृत्तामध्ये दिलेल्या

मान्यतेनुसार विद्यमान विद्याशाखांना १००% अनुदानवर देण्यात घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक २६ मे, २०२२ अन्वये १००% अनुदान मंजूरी देण्यात आलेली आहे.

उक्त शासन निर्णयान्वये धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्येशीय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेस तालुका एकमेव योजनेंतर्गत १०० टक्के अनुदान प्राप्त झाले, बांधिलकी खर्चाखाली समावेश करण्यासाठी डिसेंबर, २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशनात सादर करण्यात आलेली लाक्षणिक पूरक मागणी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय दिनांक ०२ जून, २०२३ अन्वये सदर महाविद्यालयाची शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या वेतन खर्चाचा बांधिलकी खर्चाखाली समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशीत विद्यार्थी संख्या विचारात घेवून दिनांक ०१.१०.२०२१ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारे विज्ञान शाखेतील अनुज्ञेय करण्यात आलेल्या शिक्षकीय पदांच्या पदभरतीस मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील तालुका एकमेव योजनेंतर्गत १००% अनुदान प्राप्त धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्येशीय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा या महाविद्यालयास वित्त विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन सहायक प्राध्यापक संवर्गातील १५ रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. पदभरतीस मान्यता देण्यात येत असलेल्या सहायक प्राध्यापक संवर्गाच्या पदांचा तपशिल कार्यभारानुसार खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | विषय/पदे | सन २०२१-२२ चा एकुण कार्यभार | सन २०२१-२२ च्या विद्यार्थीसंख्या आधारे पदे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर | भरलेली | रिक्त |
| १. | भौतिकशास्त्र | ६५ | ०३ | ०० | ०३ |
| २. | रसायनशास्त्र | ९६ | ०५ | ०० | ०५ |
| ३. | वनस्पतीशास्त्र | ५४ | ०३ | ०२ | ०१ |
| ४. | सुक्ष्मजीवशास्त्र | ६६ | ०३ | ०१ | ०२ |
| ५. | प्राणिशास्त्र | ६६ | ०३ | ०१ | ०२ |
| ६. | गणित | ३३ | ०२ | ०० | ०२ |
| एकुण | | | १९ | ०४ | १५ |

३. सहायक संचालक, मागासवर्ग कक्ष, विभागीय कार्यालय, अमरावती यांनी दिनांक ११.०३.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पदभरतीस मान्यता देण्यात येत असलेल्या १५ सहायक प्राध्यापक संवर्गातील पदांचे आरक्षण खालील तक्त्यातील अनुक्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | तपशील | अ.जा १३% | अ.ज. ७% | विजा अ ३% | भजब २.५% | भज क ३.५% | भज ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | साशै माप्र १०% | ईडब्ल्यूएस १०% | खुला २८% | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंजूर पदे | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ (आधी पाळी) | ०० | ०५ | ०३ | ०३ | ०८ | २९ |
| २. | ०१.०१.२०२४ रोजी कार्यरत पदे | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | | ०० | १२ | १३ |
| ३. | रिक्त पदे | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०५ | ०३ | ०३ | -०४ | १६ |
| ४. | अनुशेष | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०० | ०० | ०० | ०६ |
| ५. | अतिरिक्त | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०४ | ०४ |
| ६. | भरावयाची पदे | ०२ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०५ | ०१ | ०१ | ०० | १५ |

४. उपरोक्त नुसार मान्यता देण्यात आल्याप्रमाणे सहायक प्राध्यापक संवर्गातील १५ पदांची भरती प्रक्रीया राबविताना विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठ कायद्यातील प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. सदरची पदभरती ही खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून असेलः-

१. सहायक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पदावरच पदभरती करण्याची खातरजमा संबंधीत विभागीय सहसंचालक यांनी करावी. सदरहू नियुक्त्यांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झाल्यास, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

२. सहायक प्राध्यापक या संवर्गातील पदभरतीसाठी मागासवर्गीय कक्षाकडून आरक्षण निश्चित करुन घेतलेल्या पदांची बिंदुनामावलीनुसारच पदे भरण्यात यावीत. प्रवर्गनिहाय सामाजिक आरक्षण, सामाजिक आरक्षणाव्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आरक्षण व समांतर आरक्षण (महिला, खेळाडू, अपंग इ.) तपासूनच पदभरती करण्यात यावी. अनुशेषाची पदे प्राधान्याने भरण्यात यावीत.

३. सहायक प्राध्यापक पदभरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विहीत तरतदींनुसार भरती प्रक्रीयेमध्ये शासन व विद्यापीठ प्रतिनिधी उपस्थित नसल्यास, सदरची भरती प्रक्रीया अवैध समजण्यात यावी. तथापि, सदरच्या विहीत प्रक्रीयेस बगल देऊन संस्थेने/महाविद्यालयाने नियुक्ती आदेश दिल्यास आणि त्यास संबंधित विभागीय सहसंचालक/विद्यापीठ यांनी मान्यता दिल्यास, संबंधीत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

४. सहायक प्राध्यापक पदे भरतांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा ७ व्या वेतन आयोगाचा शासन निर्णय क्रमांक Misc-२०१८/CR-५६/१८/UNI-१, दिनांक ०८.३.२०१९ तसेच शुद्धीपत्रक क्रमांक Misc-२०१८/CR-५६/१८/UNI-१, दिनांक १०.५.२०१९ मधील विहीत तरतुदी तसेच त्यामध्ये वेळोवेळी

करण्यात आलेल्या सुधारणा आणि शिक्षकेतर पदांच्यासंदर्भात शासनाच्या दिनांक २६.८.१९९९ मधील विहीत तरतुदी विचारात घेऊनच, पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हतापात्रता / तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील विहीत तरतुदी आणि शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. सदर पदांची नियुक्ती करताना प्रचलित विद्यापीठ कायद्यानुसार शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या विहीत निवड समितीमार्फतच निवड करण्यात यावी. विहीत कार्यपद्धतीचा अवलंब न करता भरलेले पद रद्द करण्यात येईल व नियुक्तीच्यासंदर्भात भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांची राहील.

६. सहायक प्राध्यापक संवर्गातील पदांच्या निवड प्रक्रियेसाठी प्रचलित नियमातील/ परिनियमातील तरतुदींचा विचार करुन उमेदवारांची पात्रता निश्चित करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तसेच प्रचलित नियमास बगल देऊन नियुक्ती देण्यात आल्यास, संबंधित विभागीय सहसंचालक/विद्यापीठ/प्राचार्य/व्यवस्थापन हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

७. सहायक प्राध्यापक या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने इतरत्र पदस्थापना करण्यात आली असल्यास, सदर रिक्त पदावर कोणत्याही परिस्थितीत नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही. अशा प्रकारच्या पदांचा समावेश पदभरतीच्या प्रस्तावात करण्यात आल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्राचार्य व संस्थेची राहील.

८. सहायक प्राध्यापक संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने धारणाधिकार ठेवला असल्यास, सदर रिक्त पदावर कोणत्याही परिस्थितीत धारणाधिकार संपुष्टात येईपर्यंत नवीन नियुक्ती करण्यात येणार नाही आणि अशा प्रकारच्या नियुक्त्या केल्यास प्राचार्य व संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

९. सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे भरताना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अर्हता, अनुभव, व्यावसायिक पात्रता यांचे तंतोतंत पालन करून, सदरची पदभरती करण्यात यावी. याबाबतीत अनियमितता झाल्यास त्याला सर्वस्वी संबंधित विभागीय सहसंचालक/ विद्यापीठ/प्राचार्य/ संस्थेचे व्यवस्थापन जबाबदार राहतील.

१०. अनुज्ञेय सहायक प्राध्यापक संवर्गातील पदे निश्चित करण्यासाठी मंजूर तुकडी, तुकडीची विद्यार्थी क्षमता व आवश्यक ते सर्व निकष व नियमांचे अनुपालन करुन पदे अनुज्ञेय केल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांची राहील.

११. सहायक प्राध्यापक या संवर्गातील अतिरिक्त पदांचे समायोजन केले असल्याची पुनःश्च खातरजमा करण्याची जबाबदारी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांची राहील.

१२. मान्यताप्राप्त रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सदर मान्यतेच्या/नाहरकत प्रमाणपत्राच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात यावी. सहा महिन्यांनंतर सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ अनौसं/४४आपुक २३.१.२०२४ दिनांक , प्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येतअन्वये प्राआहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले. त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०३१३१२१५०१४५०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

ASHOK S MANDE

(अशोक शं. मांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
७. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
११. अध्यक्ष/सचिव, धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर, जि. बुलढाणा संचलित, श्रीमती. सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, ता. मेहकर , जि. बुलढाणा
१२. निवडनस्ती/म.शि.५ कार्यासन.

# १०० बिंदु नामावली नोंदवही

क्र.-संगावअनि/२०/बीसीसी- ३२ /२०२४
दिनांक ०८/०३/२०२४

अनुसूची 'अ'

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(मागासवर्ग कक्ष)

(शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ आणि
शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७७/१६-क, दिनांक ६ मार्च, २०२४)

प्राथमिक तपासणी अहवाल - गोषवारा (शिक्षकीय संवर्ग)

संस्था/महाविद्यालयाचे नांव :- धर्मवीर दिलीपराव राहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर द्वारा संचालित –
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा(३३०)

संदर्भ :- १) सहसंचालक, उ.शि. अमरावती विभाग यांचे पत्र क्र.ससं/उशि/अनि-१/पदनिश्चिती/२०१७/२०१९/१४६, दिनांक ७.१.२०१९
२) सहसंचालक, उ.शि. अमरावती विभाग यांचे पत्र क्र.ससं/उशि/अनु/बुलढाणा/२०२४/४८१६२७/२०२४/डि.ओ./२७४८६१/२०२४ १५.२.२०२४

संवर्ग :- सहाय्यक प्राध्यापक + संचालक, शारिरीक शिक्षण + ग्रंथपाल. एकूण मंजुर पदे :- २९

| अ.क्र. | विवरण | अजा १३% | अज ७% | विजा अ ३% | भज ब २.५% | इमाव १९% | भज क ३.५% | सा.शै.मा.व. १०% | आदुघ १०% | भज ड २% | विमाप्र २% | अराखीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण मंजूर पदे | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०१ | ०३ | ०३ | ०१ आळीपाळीने | | ०८ | २९ |
| २ | कार्यरत पदे | ०१ | — | — | — | — | — | — | — | — | | १२ | १३ |
| ३ | अतिरिक्त पदे | — | — | — | — | — | — | — | — | — | | ०४ | ०४ |
| ४ | रिक्त पदे | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०१ | ०३ | ०३ | ०१ | — | — | २० |
| ५ | अनुशेष | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०५ | ०१ | ०३ | ०३ | ०१ | — | — | २० |

टिप – दिनांक ७.४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार शिक्षकीय पदांचा संवर्ग एकत्रित केल्यामुळे खुल्या प्रवर्गात ०४ पदे अतिरिक्त ठरत आहेत. तथापि, अनुशेषाची पदे प्राधान्याने भरण्यात यावीत.

१. नियुक्ती प्राधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे आधारे बिंदूनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास तसेच बिंदूनामावली नोंदवहीबाबत काहीही तक्रार उद्भवल्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.
२. नियुक्ती करतांना संदर्भ आदेशात नियुक्तीचा प्रवर्ग नमूद करावा.
३. मागासवर्गीय प्रवर्गाकरिता आरक्षित असलेली पदे भरून रिक्त झाल्यानंतर दिनांक २७.२.२०२४ आणि ६.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारीत बिंदूनामावली अद्यावत करून पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.
४. सर्व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची तसेच दफ्तरी ठेवण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.
५. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आरक्षण अधिनियम, २००१, महाराष्ट्र जातवैधता पडताळणी अधिनियम, २००० व तसेच यासंदर्भात शासनाचे सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. बिंदूनामावली तपासणीमध्ये वरील संवर्गात दर्शविलेला अनुशेष शासनाने ठरवून दिलेल्या विहित कार्यपध्दतीने पूर्ण करावा. त्याबाबतची नोंद बिंदूनामावली नोंदवहीमध्ये वेगळा गोषवारा काढून दर्शविण्यात यावी.
६. अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार अपंग व्यक्तींना शासकीय/निमशासकीय सेवेत आरक्षण देवून, दिव्यांग व्यक्ती अधिनियम, २०१६ नुसार अपंगाची पदे तसेच दिनांक २९.५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तींसाठी ४ टक्के आरक्षण भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. दिनांक २८.१२.२०१८ रोजीचा समांतर आरक्षणासंदर्भातील शासन पत्र तसेच, दि. २५.२.२०२४ व २९.२.२०२४ रोजी शासनाने आरक्षण धोरणानुषंगिक वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकानुसार समांतर आरक्षणाची पदे (महिला, माजी सैनिक,खेळाडू,प्रकल्पग्रस्त, अपंग, अनाथ, इत्यादी) भरण्याची जबाबदारी ही नियुक्ती प्राधिकारीचीच आहे.
७. बिंदूनामावली मा.सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून अंतिम प्रमाणित असल्याखेरीज कुठलीही नियुक्तीची कार्यवाही करू नये.
८. महाराष्ट्र लोकसेवा आरक्षण अधिनियम, २००१ मधील तरतुदींचे उल्लंघन करून केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक होतील. तसेच अधिनियमातील प्रयोजनाचे उल्लंघन होईल अशा उद्देशाने कृती केली तर, नियुक्ती प्राधिकारी कलम ८ (१) नुसार शिक्षेस पात्र ठरेल.
९. शासन परिपत्रक दिनांक ५.११.२००१ मधील परिच्छेद क्र. ५ नुसार मागास प्रवर्गाच्या जागांवर बिगर मागास प्रवर्गाचे कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही याची खात्री करून घ्यावी. जर अशा प्रकारे गैरमार्गाने नियुक्त्या केल्या असल्यास त्वरीत अशा नियुक्त्या रद्द करून रिक्त होणारी पदे संबंधित मागास प्रवर्गातून भरण्यात यावीत. अन्यथा अशा अनियमिततेस नियुक्ती प्राधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहील.

Wankhade
Asstt. Registrar (B.C. Cell)
Sant Gadge Baba Amravati University

Scanned with OKEN Scanner

क्रमांक/आरवी/बीसीसी/ /52 17

आयुक्त यांचे कार्यालय

अमरावती विभाग, अमरावती.

VERIFIED

I/305432/2024

वशिआअ-16011(11)/1/2024-DCAMT-Bcell दिनांक 11.03.2024

**विषय :** धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, मेहकर येथिल सहायक प्राध्यापक पदाचा बिंदुनामावली प्रस्ताव.

**संदर्भ :** प्राचार्य, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जि.बुलढाणा यांचा प्रस्ताव दि.७.३.२०२४

---

**पदाचे नाव - सहायक प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक (शा.शि.)** (शासकोटा १००%)

| अ. क्र. | तपशील | अजा १३% | अज ७% | विजा-अ ३% | भज-ब २.५% | भज-क ३.५% | भज-ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | साशैमाप्र १०% | इडब्ल्यू एस १०% | खुले ३८% | एकुण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मंजूर पदे | ४ | २ | १ | १ | १ | १ (आंशी पाळीने) | ० | ५ | ३ | ३ | ८ | २९ |
| २. | १.१.२०२४ रोजी कार्यरत पदे | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १२ | १३ |
| ३. | रिक्त पदे | ३ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ३ | ३ | -४ | १६ |
| ४. | अनुशेष | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | ० | ० | ० | ०६ |
| ५. | अतिरिक्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ०४ |

| तपशील | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | साशैमाप्र १०% | इडब्ल्यू एस १०% | खुले | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण रिक्त पदे | ३ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | ३ | ३ | -४ | १६ |
| प्रत्यक्षात भरावयाची पदे | २ | २ | १ | १ | १ | १ | ० | ५ | १ | १ | ० | १५ |

टिप- १) शासन अधिसूचना दि.७.४.२०२२ नुसार सहायक प्राध्यापक संवर्ग एकत्रित केल्यामुळे व शासन निर्णय दि.६.३.२०२४ नुसार आरक्षण निश्चित केल्यामुळे खुल्या प्रवर्गात ४ पदे अतिरिक्त ठरत आहे. २) खुल्या प्रवर्गातील ४ पदे रिक्त होईपर्यंत इडब्ल्यूएस प्रवर्गातील २ पदे व साशैमाप्र २ पदे रिक्त ठेवण्यात यावे.

---

१) नियुक्ति करताना, नियुक्ती आदेशात नियुक्तीचा प्रवर्ग नमूद करावा. बिंदुनामावली प्रमाणित असल्याशिवाय कुठलीही नियुक्ती करु नये.
२) सर्व मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन दाखल ठेवावे.
३) संस्था तसेच संस्थेची कार्यकारीनी वैध असल्याबाबतची खात्री प्राथमिक तपासणी अधिकारी यांनी केली असल्याचे समजून तपासणी करण्यात आलेली आहे. कार्यकारीनी संदर्भात वाद अथवा तक्रार झाल्यास प्राथमिक तपासणी अधिकारी जबाबदार राहतील.
४) नियुक्ती प्राधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे आधारे तसेच प्राथमिक तपासणी अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर माहिती चुकीची असल्याचे निष्पन्न झाल्यास अथवा बिंदूनामावली नोंदवहीबाबत काहीही तक्रार उद्भवल्यास संबंधीत नियुक्ती प्राधिकारी जबाबदार राहतील.
५) आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४ नुसार विहित टक्केवारीपेक्षा अतिरिक्त पदे भरली जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.
६) बिंदूनामावली तपासणीस ३ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यास किंवा मंजूर पदसंख्येमध्ये वाढ/घट झाल्यास किंवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास अथवा पद रिक्त झाल्यास दरवर्षी, तसेच पदभरतीच्या वेळी विहित मुदतीपूर्वी बिंदूनामावली प्रमाणित करण्यात यावी.
७) महाराष्ट्र लोकसेवा आरक्षण अधिनियम, २००१ मधील तरतुदींचे उल्लंघन करुन केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक होतील व अशी कृती याच अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र ठरेल.
८) शासन निर्णय दि.२५.२.२०२२ मधील अनुसूची-अ नुसार छोट्या संवर्गाकरीता आळीपाळीने पदे भरण्यात यावी.
९) सा.प्र.वि.शासन परिपत्रक दि.५.११.२००१ मधील परिच्छेद क्र.५ नुसार मागासप्रवर्गाच्या जागेवर बिगर मागासप्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही याची खात्री करुन घ्यावी. जर अशाप्रकारे गैरमार्गाने नियुक्त्या केल्या असल्यास त्वरीत अशा नियुक्त्या रद्द करुन रिक्त होणारी पदे संबंधीत मागासप्रवर्गातुन भरण्यात यावी. अन्यथा अशा अनियमिततेस नियुक्ती प्राधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहतील.
१०) मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे जातप्रमाणपत्र पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आरक्षण अधिनियम, २००१, महाराष्ट्र जातवैधता पडताळणी अधिनियम, २००० व तसेच यासंदर्भात शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.
११) बिंदूनामावली तपासणीमध्ये वरील संवर्गात दर्शविलेला अनुशेष शासनाने ठरवून दिलेल्या विहीत कार्यपध्दतीने पूर्ण करावा. त्याबाबतची नोंद बिंदूनामावली नोंदवहीमध्ये वेगळा गोषवारा काढून दर्शविण्यात यावी.

Signed by
Vaishali Ramkrushna Pathare
Date: 11-03-2024 13:32:21

(वैशाली पाथरे)
सहायक आयुक्त (मावक)
अमरावती विभाग, अमरावती

**महाराष्ट्र शासन**

कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण,अमरावती विभाग,
(शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था परिसर) अमरावती -४४४ ६०४

Web: www.jdheamravati.org.in ☏ क्रमांक -०७२१-२९७०५४७ Mail-jdheamt@yahoo.com

जावक क्रमांक- ससं/उशि/अनु-२/माहीती /२०२४/ दिनांक -१३/०३/२०२४

प्रति,
कुलसचिव,
संतगाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय :- ना-हरकत प्रमाणपत्राबाबत.**
**संदर्भ :- प्राचार्य, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर यांचे पत्र क्रमांक ५२७ /२४ दिनांक १३.०३.२०२४**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शासन निर्णय २६.०५.२०२२ नुसार धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउदेशिय संस्था , मेहकर संचालित श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर या महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखेस तालुका एकमेव योजने अंतर्गत १०० टक्के अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे तसेच शासन निर्णय ०२.०६.२०२३ व ०६.०६.२०२३ नुसार मंजुर पदांच्या अनुषंगाने कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतन खर्चाचा बांधिलकी खर्चाखाली समावेश करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय १३.०३.२०२४ नुसार श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर या महाविद्यालयातील विज्ञान विद्याशाखेतील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील १५ पदांची पदभरती करण्यास शासन निर्णयात नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तरी आपण शासन निर्णयातील अटी व शर्तीची तपासणी करुन पदभरतीसंदर्भात पुढील कार्यवाही करावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव महाविद्यालयाचे नाव | शासन निर्णय क्रमांक व दिनांक | नाहरकत प्रमाणपत्रातील पदभरतीस मान्यता दिलेली पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | धर्मवीर दिलीपराव रहाटे शिक्षण व बहुउदेशिय संस्था , मेहकर संचालित श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक HTED-३००१०(१०) /८८/२०२३-MHT- (HE-५) दिनांक १३ मार्च २०२४ | सहाय्यक प्राध्यापक - १५ |

Signed by
Umesh Bhauraoji Kakde
Date: 13-03-2024 13:35:34

**( डॉ. उमेश काकडे )**
सहसंचालक,उच्च शिक्षण
अमरावती विभाग, अमरावती

प्रत :- प्राचार्य , संबंधीत महाविद्यालय

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

क्रमांक : संगाबाअवि/८/सी- ४०५ /२०२४
दिनांक : १३ . ०३ . २०२४

प्रति,
अध्यक्ष / सचिव / प्राचार्य,
श्रीमती सिंधुताई जाधव
कला व विज्ञान महाविद्यालय,
मेहकर, जि. बुलडाणा

विषय :- प्राचार्य / शिक्षक पदाच्या जाहिरातीस मान्यता देण्याबाबत.
संदर्भ :- आपले पत्र क्र. 528/2024 दि. 13/03/2024

महोदय,

संदर्भांकीत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या ~~संस्थेद्वारा संचालित~~ श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर, जि. बुलडाणा या महाविद्यालयास सत्र २० - २० मध्ये नियुक्त करण्यासाठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या प्राचार्य/शिक्षक पदाच्या जाहिरातीचे प्रारूप मान्य करून यासोबत पाठविण्यात येत आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या दि. २२-२-२०१९ (तहकूब सभा दि. २१-२-२०१९) रोजी झालेल्या सभेतील मुद्दा क्र. ५२ च्या इतिवृत्तानुषंगाने, वृत्तपत्रात प्रकाशित करण्याकरीताचा जाहीरातीचा सुधारीत मसुदा व स्वरूप सुध्दा यासोबत मंजूर करून देण्यात येत आहे. (Appendix-A) सदर मसुद्यात महाविद्यालयाचे संकेतस्थळ नमुद करावे. सविस्तर जाहीरात संकेतस्थळावर जशीच्या तशी प्रकाशित करावी आणि सुधारीत जाहीरात जशीच्या तशी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दोन वृत्तपत्रात प्रकाशित करावी.

उपरोक्त जाहीरात आपण ज्या दिवशी संकेतस्थळावर प्रकाशित करणार आहात त्याबाबतचे पत्र विशेष दूतामार्फत ८ दिवसापूर्वी विद्यापीठात पाठवावे म्हणजे योग्य वेळी महाविद्यालयाच्या मागणी प्रमाणे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीरात प्रकाशित करता येईल.

जाहीरात कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाची याबाबतची माहीती सुद्धा पाठविलेली आहे. जाहिरात किमान दोन वृत्तपत्रात प्रकाशित करावी. **त्यापैकी एक राष्ट्रीय/राज्यस्तरीय व दुसरे प्रादेशिक/स्थानिक वृत्तपत्र असावे.**

**अधिसभेच्या दि. १४-०३-२०१५ रोजीच्या सभेत मुद्दा क्र. ९५ अंतर्गत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या, विद्यापीठ रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्रातून सहा.प्राध्यापक पदाकरीता पात्रताधारक उमेदवारांची यादी घ्यावी व त्यांनाही मुलाखतीकरीता बोलवावे.**

निदेश क्र. ०८/२०१९, निदेश क्र. १४/२०१९ व निदेश क्र. १७/२०१९ तसेच शासन नियमांचे व काटेकोरपणे पालन करावे. अभियांत्रिकी व तांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांनी उपरोक्त नियम व निदेशासोबतच, निदेश क्र. ५०/२०१९, निदेश क्र. ०६/२०२२, ए.आय.सी.टी.ई व एन.सी.टी.ई. च्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

**पात्रताधारक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यावर निवड समिती मिळणेसाठी पत्र देण्यात यावे. त्यानुसार आपणांस निवड समिती कळविण्यात येईल.**

प्राचार्य / शिक्षक मान्यतेचा प्रस्ताव सादर करतांना उपरोक्त प्रपत्रांमध्ये संपुर्ण माहिती अचूकपणे भरून पाठववावी. अपूर्ण माहिती असल्यास किंवा आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास प्राचार्य / शिक्षक मान्यतेकरीता होणाऱ्या विलंबाची संपुर्ण जबाबदारी संस्थेची / महाविद्यालयाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

आपली विश्वासु,

(स्वाक्षरी)

उपकुलसचिव (म.वि.)
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,
अमरावती

20

C-1923

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

No. SGBAU/8/ C-405 /2024
Date: 13 /03/2024

Name of College:- Smt. Sindhutai Jadhao Arts & Science college Mehkar. Dist. Buldana

## WANTED

Applications are invited for the post(s) of **Assistant Professor (s).**
**(Arts, Humanities, Sciences, Social Sciences, Commerce, Education, Physical Education, Languages, Law, Journalism and Mass Communication, Library Science)**

| Sr. No. | Name of the Post | Subject/Course | No. of Post | Categary as per NOC on dt. 13-03-2024. |
|---|---|---|---|---|
| 01. | Assistant Professor | Physics | 03 | SC-02<br>ST-02<br>VJ(A)-01<br>NT(B)-01<br>NT(C)-01<br>NT(D)-01<br>OBC-05<br>SEBC-01<br>EWS-01 |
| 02. | Assistant Professor | Chemistry | 05 | |
| 03. | Assistant Professor | Botany | 01 | |
| 04. | Assistant Professor | Microbiology | 02 | |
| 05. | Assistant Professor | Zoology | 02 | |
| 06. | Assistant Professor | Mathematics | 02 | |

(समांतर आरक्षण भरण्यात येईल या अटीवर. समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे आहे – अपंग-०१, महिला-०४, खेळाडू-०१)

**QUALIFICATIONS:-**

A.

i. A Master's degree with 55% marks (or an equivalent grade in a point-scale wherever the grading system is followed) in a concerned/ relevant/ allied subject from an Indian University, or an equivalent degree from an accredited foreign university.

ii. Besides fulfilling the above qualifications, the candidate must have cleared the National Eligibility Test (NET) conducted by the UGC or the CSIR, or a similar test accredited by the UGC, like SET or who are or have been awarded a Ph. D. Degree in accordance with the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.Phil./Ph.D. Degree) Regulations, 2009 or 2016 and their amendments from time to time as the case may be exempted from NET/SET :

iii. *Provided* the candidates registered for the Ph.D. programme prior to July 11, 2009, shall be governed by the provisions of the then existing Ordinances / Bye-laws / Regulations of the Institution awarding the degree and such Ph.D. candidates shall be exempted from the requirement of NET/ SET for recruitment and appointment of Assistant Professor or equivalent positions in Universities/Colleges/Institutions subject to the fulfillment of the following conditions:

a) The Ph.D. degree of the candidate has been awarded in regular mode only;
b) The Ph.D. thesis has been evaluated by at least two examiners;
c) An open Ph.D. *viva voce* of the candidate has been conducted;
d) The candidate has published two research papers from his/her Ph.D. work, out of which at least one is in a refereed journal; and
e) The candidate has presented at least two papers, based on his/her Ph.D. work in conferences/seminars, sponsored/ funded/supported by. the UGC/ICSSR/CSIR or any similar agency.

(P.T.O.)

**Note:** .

1. *The fulfillment of these conditions is to be certified by the Registrar or the Dean (Academic affairs) of the University concerned.*
2. NET/SET shall also not be required for such Masters Programmes in disciplines for which NET/SET is not conducted. However, Ph.D. degree shall remain the minimum eligibility for appointment of Assistant Professor in such disciplines.

OR

B.

The Ph.D. degree has been obtained from a foreign university/institution with a ranking among top 500 in the World University Ranking (at any time) by any one of the following:

i. Quacquarelli Symonds (QS) ;
ii. the Times Higher Education (THE) or
iii. the Academic Ranking of World Universities (ARWU) of the Shanghai Jiao Tong University (Shanghai).

Note :

a. *A relaxation of 5 % may be provided, at Bachelor's as well as Master's level for the Scheduled Caste/Scheduled Tribe/ Differently-abled (Physically and visually differently-abled)/other backward class categories for the purpose of eligibility and for assessing good academic record during direct recruitment to teaching positions. The eligibility marks of 55 % marks ( or an equivalent grade in a point scale wherever grading system in followed) and the relaxation of 5 % to the categories mentioned above are permissible, based on only the qualifying marks without including any grace mark procedure. (See para 4.4. of G.R. dt. 8th March, 2019 under Direction No. 8/2019)*

b. ***A relaxation of 5 % may be provided, from 55 % to 50 % of the marks to the Ph.D. degree holders, who have obtained their Master's Degree prior to 19 September, 1991.***

c. ***A Relevant Grade which is regarded as equivalent of 55 % wherever the grading system is followed by a recognized university shall also be considered eligible.***

d. ***The Academic score as specified in Appendix II (Table 3B) of Direction No. 8/2019 and Govt. Resolution dated 8th March, 2019 for Colleges, shall be considered for short-listing of the candidates for interview only, and the selections shall be based only on the performance in the interview.***

1) The application may be made on a plain paper/prescribed proforma & addressed to the Principal/Dean/Director/ Secretary on the address given below on or before dated________ along with a crossed postal order of Rs_______/- drawn in the favour of the Principal/Dean/Director/ Secretary and certified copies of the relevant certificates/ testimonials towards substantiation of eligibility in terms of academic qualifications.
2) Those who are already in employment shall route their applications through their parent employer, furnishing an advance copy of the same to the Principal. However, it shall be binding for the applicant to furnish the 'No Objection Certificate' from the parent employer on or before the date of interview.

Pay Scale – As Per UGC & State Government Norms.

NOTE:- Details regarding qualification and relaxation in qualification and other details/ conditions are available at the University website www.sgbau.ac.in

**PRINCIPAL**

**APPROVED**

Dy. Registrar (Coll.)
**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**

Copy to : Asstt. Director of Employment, Sant Gadge Baba Amravati University Campus.

Advertisement-19-20

पुण्य नगरी

# WANTED

**Dharmveer Diliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya sanstha, Mehkar's Smt. Sindhutai Jadhao Arts and Science College Mehkar Dist. Buldhana**

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities /Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes

| Sr. No. | Name of the Post | Subject/ Course | No. of Post | Categary as per NOC on dt. 13-03-2024 |
|---|---|---|---|---|
| 01 | Assistant Professor | Physics | 03 | SC-02<br>ST-02<br>VJ(A)-01<br>NT(B)-01<br>NT(C)-01<br>NT(D)-01<br>OBC-05<br>SEBC-01<br>EWS-01 |
| 02 | Assistant Professor | Chemistry | 05 | |
| 03 | Assistant Professor | Botany | 01 | |
| 04 | Assistant Professor | Microbiology | 02 | |
| 05 | Assistant Professor | Zoology | 02 | |
| 06 | Assistant Professor | Mathematics | 02 | |

**(समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे आहे : अपंग ०१, महिला ०४, खेळाडू ०१)**

**For qualification/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sgbau.ac.in and college website www.ssjasm.in Qualified candidates should send their applications alongwith all attested copies of certificates and testimonials of their qualification with passport size photograph to Hon Secretary. Dharmveer Diliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya sanstha, Mehkar's Smt. Sindhutai Jadhao Arts and Science College Mehkar Dist. Buldhana Pin443301**

**The application should be sent within 20 days of publication of this advertisement**

**Contact for details: 9860974148, 9921659741**

**President** **Secretary** **Principal**

Nagpur_ Edition
Mar 14, 2024 Page No. 4
Powered by : eReleGo.com

22

# दैनिक भास्कर

आप पढ़ रहे हैं देश का सबसे विश्वसनीय और नंबर 1 अ[illegible]

अकोला, गुरुवार 14 मार्च 2024 फाल्गुन शुक्ल पक्ष 4/5, 2080

## अड्डे पर छापा, तीन गिरफ्तार, एक फरार

देशी शराब अड्डे पर छापा मारकर तीन आरोपियों को पकड़ने की घटना [illegible] के बाडी [illegible] में घटी। मामले में पुलिस ने उक्त आरोपियों के खिलाफ विविध धाराओं के तहत अपराध दर्ज किया है। [illegible]



[illegible] कार्रवाई में कुल २५ हजार [illegible] रुपयों का माल जब्त किया गया है। यह कार्रवाई पुलिस निरीक्षक [illegible] ने की है।

## [illegible]कार्य घटियास्तर का

[illegible]

## जाहिर नोटीस

[illegible]

## रेलवे स्थानक पर वृध्द की आकस्मिक मौत

खामगांव: यहां के रेलवे स्थानक पर के एटीएम सामने एक ७५ वर्षीय वृध्द की आकस्मिक मौत होने की घटना बुधवार दि १३ मार्च को सुबह ११ बजे उजागर हुई है। मामले में पुलिस ने मर्ग दाखिल किया। स्थानीय रेलवे स्थानक पर के एटीएम सामने दि १३ मार्च की सुबह एक वृध्द मृत स्थिति में नागरिकों को नजर आया। जानकारी मिलते ही शहर पुलिस तुरंत घटनास्थल पर पहुंची। उक्त शव कब्जे में लेकर सामान्य अस्पताल में लेकर गए। शुरूआत में वृध्द की पहचान नहीं हुई थी, लेकिन कुछ समय बाद पुलिस ने पूछताछ करने पर मृतक की पहचान हुई। उसका नाम [illegible] (७५) निवासी [illegible] है। मामले में मृतक के [illegible] ने दर्ज किए शिकायत पर से पुलिस ने मर्ग दाखिल किया है।

## जाहिर सूचना

[illegible]

# WANTED

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University

**Dharmveer Dilliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya sanstha, Mehkar's Smt. Sindhutai Jadhao Arts and Science College Mehkar Dist. Buldhana**

Applications are invited for Full Time Regular Posts as per fol lowing details in the faculty of Science & Technology/Humanities / Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**

| Sr.No. | Name of the Post | Subject/Course | No. of Post | Categary as per NOC on dt.13-03-2024. |
|---|---|---|---|---|
| 01 | Assistant Professor | Physics | 03 | SC-02 ST-02 VJ(A)-01 NT(B)-01 NT(C)-01 NT(D)-01 OBC-05 SEBC-01 EWS-01 |
| 02 | Assistant Professor | Chemistry | 05 | |
| 03 | Assistant Professor | Botany | 01 | |
| 04 | Assistant Professor | Microbiology | 02 | |
| 05 | Assistant Professor | Zoology | 02 | |
| 06 | Assistant Professor | Mathematics | 02 | |

**(समांतर आरक्षण पुढील प्रमाणे आहे. अपंग - 01, महिला- 04, खेळाडू-01)**

For qualification/Experience/Pay Scale and other details/conditions visit university website www.sghau.ac.in and college website www.ssjasm.in Qualified candidates should send their applications alongwith all attested copies of certificates and testimonials of their qualification with passport size photograph to Hon Secretary, Dharmveer Diliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya sanstha, Mehkar's Smt. Sindhutai Jadhao Arts and Science College Mehkar Dist. Buldhana Pin-443301

**Contact for details: 9860974148, 9921659741**

**The Application should be sent within 20 days of publication of this advertisement.**

**President** **Secretary** **Principal**




## GOA COLLEGE OF PHYSIOTHERAPY, NATUROPATHY AND YOGIC SCIENCE BY SNI

(Affiliated to Goa University & Government Aided Institute)

Application of the following vacant posts near electricity department, Thivim- Goa.

### Program: BACHELOR OF NATUROPATHY AND YOGIC SCIENCES

**Requirement for full time regular post.**

| Sr. No. | Post | No. of Posts (Regular Basis) | Qualification | Category |
|---|---|---|---|---|
| 1. | Assistant Professor in Anatomy | 1 | MD (Anatomy)/ MD (Sharir Rachana) / MSc (Anatomy) | Out of 4 posts one is reserved for **PwD (locomotor disability)** and out of 4 one is reserved for OBC. |
| 2. | Assistant Professor in Physiology | 1 | MD (Physiology) / MD (Sharir Kriya) / MSc (Physiology) | |
| 3. | Assistant Professor in Philosophy of Naturopathy | 1 | BNYS, MD Naturopathy/Yoga/ MD (Swasthavritta) | |
| 4. | Assistant Professor in Biochemistry | 1 | MD (Biochemistry)/ MSc (Biochemistry) | |

Applications are hereby invited in the prescribed **"Application Form"** with self-attested true copies of desired documents and educational qualifications. The prescribed **"Application form"** is available on the college **website "www.gcpnygoa.com"**. The applications from the eligible candidates should reach the undersigned **within 15 days** of the publication of this advertisement to be forwarded to:

The
Chief Executive Officer,
Goa College of Physiotherapy, Naturopathy and Yogic Science,
Goa Electricity Department Complex,
Thivim, Goa. 403502

For eligibility, desirable experience, terms and conditions, kindly refer our **website: https://gcpnygoa.com/**

**Dharmveer Diliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya Sanstha, Mehkar's**

## SMT. SINDHUTAI JADHAO ARTS AND SCIENCE COLLEGE MEHKAR DIST. BULDHANA

**Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati**

**WANTED**

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities / Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**

| Sr. No. | Name of the Posts | Subject/ Course | No. of Posts | Category as per NOC on Dt. 13-03-2024. |
|---|---|---|---|---|
| 01 | **Assistant Professor** | Physics | 03 | SC-02<br>ST-02<br>VJ(A)-01<br>NT(B)-01<br>NT(C)-01<br>NT(D)-01<br>OBC-05<br>SEBC-01<br>EWS-01 |
| 02 | **Assistant Professor** | Chemistry | 05 | |
| 03 | **Assistant Professor** | Botany | 01 | |
| 04 | **Assistant Professor** | Microbiology | 02 | |
| 05 | **Assistant Professor** | Zoology | 02 | |
| 06 | **Assistant Professor** | Mathematics | 02 | |

(समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे आहे – अपंग –01, महिला –04, खेळाडू–01)

For qualification/ Experience/ Pay Scale and other details/ conditions visit university **website www.sgbau.ac.in** and college **website www.ssjasm.in.**

Qualified candidates should send their applications along with all attested copies of certificates and testimonials of their qualification with passport size photograph to **Hon Secretary, Dharmveer Diliprao Rahate Shikshan va Bahuddeshiya sanstha, Mehkar's Smt. Sindhutai Jadhao Arts and Science College Mehkar Dist. Buldhana Pin 443301.**

Application should be sent **within 15 days** of publication of this advertisement.

Contact for details: 9860974148, 9921659741

**President** **Secretary** **Principal**